महानगरपालिका/नगरपालिकांमध्ये
दिव्यांगांसाठी किमान ३% निधी
राखीव ठेवणे व खर्च करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः- संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४३/१६/नवि-२८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
४ था मजला, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांकः- १४ नोव्हेंबर, २०१७

**संदर्भः-** १) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग क्र.संकीर्ण-२०१०/प्र.क्र.१४६/२०१०/नवि-६, दि.३०.१०.२०१०.
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११८/नवि-२०, दि.२८.१०.२०१५.
३) शासन पत्र, नगर विकास विभाग क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४३/१६/नवि-२८, दि.३०.०४.२०१६.
४) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि.११.०७.२०१७ च्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावनाः-**

केंद्र शासनाने अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ हा दि.०१.०१.१९९६ पासून लागू केला आहे. सदर अधिनियमातील कलम ४० अन्वये राज्यातील सर्व नागरी स्थानिक संस्थांना त्यांच्या क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणकारी कामांसाठी दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमांतर्गत ३% निधी राखीव ठेवण्याबाबत संदर्भ क्र.१ येथील दि.३०.१०.२०१० च्या शासन परिपत्रकानुसार निदेश देण्यात आले आहेत.

२. तद्नंतर शासन निर्णय दि.२८.१०.२०१५ अन्वये नागरी भागातील दिव्यांगांच्या कल्याणासाठी खर्च करावयाचा सदर ३% निधी कोणत्या प्रयोजनार्थ खर्च करावा, याबाबत मार्गदर्शक सूचनाही निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर निधी इतर प्रयोजनार्थ न वळविता, नागरी भागातील दिव्यांगांसाठीच खर्च करण्याची दक्षता घेण्याबाबत संबंधित नागरी स्थानिक संस्थांना निदेश देण्यात आलेले आहेत. यासंदर्भात मा.राज्यमंत्री (नगर विकास) महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिव्यांग बांधवांच्या अडचणींबाबत दि.११.०७.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना दिव्यांग बांधवांसाठी राखीव ठेवलेला ३% निधी खर्च केला जातो किंवा कसे, याबाबत आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर प्रकरणी ३% निधी दिव्यांगांसाठी राखीव ठेवणे तसेच तो त्याच कामासाठी खर्च करणे याची पुर्तता होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सदर निधीचा अन्य प्रयोजनासाठीही वापर होत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत. याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांचे

अध्यक्षतेखाली दि.२४.१०.२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशांच्या अनुषंगाने दिव्यांगांच्या न्याय्य हक्कांसाठी उपरोक्त बाबींची योग्य प्रकारे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील कलम ४० च्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना विहित करण्यात येत आहेत:-

**<u>शासन परिपत्रक</u>:-**

(१) राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिका यांनी त्यांच्या अर्थसंकल्पातील दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमांतर्गत दिव्यांगांसाठी ३% निधी राखीव ठेवावा.

(२) सदर ३% निधी दि.२८.१०.२०१५ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या दिव्यांगांसाठीच्या प्रयोजनाकरिता खर्च करावा. सदर प्रयोजनाव्यतिरिक्त दिव्यांगांच्या अन्य प्रयोजनार्थ निधी खर्च करणे आवश्यक असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने खर्च करावा.

(३) दिव्यांगांसाठी राखून ठेवण्यात आलेला सदर ३% निधी इतर प्रयोजनार्थ न वळविता, नागरी भागातील दिव्यांगांसाठीच खर्च करणे अनिवार्य राहील. सदर निधीचे पुनर्विनियोजन करता येणार नाही व सदर निधी रद्दही (lapse) करता येणार नाही. म्हणजेच ज्या वर्षासाठी निधी राखीव ठेवला तो त्याच वर्षात उपरोक्त नमूद प्रयोजनांसाठी खर्च करणे आवश्यक राहील.

(४) प्रत्येक महानगरपालिकेने दिव्यांग बांधवांचे विषय हाताळण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिकेतील एका उप आयुक्तांवर सोपवावी व याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.

(५) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी सर्व नगरपालिका/ नगरपंचायतींनी दिव्यांगांसाठी राखीव ठेवलेला ३% निधी खर्च करण्याबाबतची दक्षता घ्यावी.

(६) सर्व नगरपरिषद/नगरपंचायतींच्या ३% निधी खर्च करण्याबाबतचा आढावा आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी आर्थिक वर्षातील माहे मे, ऑगस्ट, नोव्हेंबर व फेब्रुवारी महिन्याच्या १५ तारखेपर्यंत घ्यावा व त्याबाबतचा अहवाल आढावा घेतलेल्या महिन्यातील ३० तारखेपर्यंत नगर विकास विभागास सादर करावा. सदर अहवालामध्ये दिव्यांगांसाठी राखीव ठेवलेला निधी, झालेला खर्च तसेच कोणत्या प्रयोजनार्थ खर्च झाला याचा सविस्तर तपशील सादर करावा.

(७) आयुक्त, महानगरपालिका यांनीही त्यांच्या महानगरपालिकांमधील दिव्यांगांसाठी राखीव ३% निधीच्या वापराबाबतचा आढावा माहे मे, ऑगस्ट, नोव्हेंबर व फेब्रुवारी महिन्याच्या १५ तारखेपर्यंत घेऊन सविस्तर अहवाल आढावा घेतलेल्या महिन्यातील ३० तारखेपर्यंत नगर विकास विभागास सादर करावा.

(८) नगर विकास विभागातील सदर विषय हाताळणारे सह/उप सचिव हे जून, सप्टेंबर, डिसेंबर व मार्च महिन्याच्या १५ तारखेपर्यंत सर्व महानगरपालिकांनी तसेच आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी दिव्यांगांसाठी राखीव ठेवलेल्या निधीच्या खर्चाबाबत सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने विस्तृत आढावा त्यांचे स्तरावर घेतील.

(९) आयुक्त, महानगरपालिका तसेच मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती यांनी दिव्यांगांच्या विविध प्रयोजनार्थ खर्च करावयाच्या ३% निधीबाबत आर्थिक वर्षाच्या प्रारंभी सुक्ष्म नियोजन (Micro Planning) करावे व त्याची संबंधित आर्थिक वर्षात काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

(१०) जर एखाद्या अधिकाऱ्याने उपरोक्त ३% निधी दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्यास, खर्च करण्यास कसूर केला अथवा सदर निधी दिव्यांग व्यक्तींच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ वापरला अथवा सदर निधीचे पुनर्विनियोजन केले अथवा पूर्णपणे खर्च केला नसल्याचे निदर्शनास आले, तर संबंधित अधिकारी शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र असतील.

२. उपरोक्त निदेशांचे तत्परतेने व काटेकोरपणे पालन होईल, या दृष्टीने संबंधितांनी तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक २०१७१११४१२२७१७२६२५ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Digitally signed by Navnath Ravaji Wath
Date: 2017.11.14 12:31:42 +05'30'

**( नवनाथ रा. वाठ )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

<u>प्रत</u>:-

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
७) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती (सर्व).
९) नगर विकास विभागातील सर्व कार्यासने.
१०) निवडनस्ती (नवि-२८).